PUNEMETROPOLIS
(PUNE METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY)

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे
Pune Metropolitan Region Development Authority, Pune
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी,पुणे-44
Ph. No.020-27166000/0-07317104386, Email: pmrda.ihlms24@gmail.com
जमीन व मालमत्ता विभाग

नियोजनबद्ध विकास

जा.क्र/गृहयोजना/से.12व 30-32 / null

दिनांकः 15-05-2026

तात्पुरते देकार पत्र (Provisional Offer Letter)

प्रति,

श्री/श्रीमती,

MOHAMMAD SADIK MOHAMMAD ABBAS SAYYAD & SHABIH FATMA

ANTARIKSHA HOUSING COMLEX BUILDING NO B/5 FLAT NO 204 C T S 6368 UDYAM NAGAR PIMPRI PUNE CITY

अर्ज क्र.1150000225

मोबाईल क्र.8421226225

विषयः - पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोडत-2026 मधील संकेत क्रमांक PC-11योजनेचे नावSector-12-Scheme-EWSया योजनेतील सदनिका वितरणाचे तात्पुरते देकार पत्र

संदर्भ : - 1. आपला अर्ज क्र.1150000225 प्रवर्ग .GPसंकेत क्रमांक PC-11

2. पुणे महानगर प्रदेशविकास प्राधिकरणाची डिसेंबर -2025 च्या जाहिरातीनुसार दि. 08 / 04/ 2026 रोजी झालेली सोडत

3. या कार्यालयाचे दि.17/02/2025 रोजीचे प्रथम सूचना पत्र व आपण दिलेली दि 14/04/2026 रोजीची online स्विकृती व अपलोड केलेली कागदपत्रे

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भ क्र.1 च्या अर्जानुसार आपण Online पद्धतीने सादर केलेली कागदपत्रे व प्रमाणपत्रानुसार आपणास IHLMS 2.0 संगणकीय प्रणालीद्वारे पात्र ठरवले आहे. संदर्भ क्र.2 च्या सोडतीनुसार आपण संदर्भ क्र.3 नुसार दिलेल्या स्विकृती अन्वये व कागदपत्रान्वये सदनिका वितरणासाठी तात्पुरते देकार पत्र (Provisional Offer Letter) देण्यात येत आहे. या पत्रातील अटी शर्तीची पूर्तता करून सदनिकेच्या किंमतीचा संपूर्ण भरणा केल्यास अंतिम वितरणपत्र देण्यात येईल.

आपणास देण्यात येणाऱ्या सदनिकेचा तपशील खालीलप्रमाणे:

योजनेचे नाव	प्रवर्ग	अर्ज क्र.	संकेत क्रमांक	सदनिका क्रमांक	सदनिकेचे चटई क्षेत्रफळ	सदनिकेची विक्री किंमत
Sector-12-Scheme-EWS	GP	1150000225	PC-11	इमारत क्र. A9, विंग - मजला 3 सदनिका क्र. 305	29.55 चौ.मी.	रु. 1731926.00 /-

सदनिकाची किंमत व इतर रक्कमांचा भरणा ऑनलाईन पद्धतीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण लॉटरी संकेत स्थळ https://housing.pmrda.gov.in या वेबसाईट वरील आपल्या लॉग ईन मध्ये पेमेंट ऑप्शन वर NEFT/RTGS ,CREDIT/DEBIT CARD, UPI PAY, INTERNET BANKING द्वारे करावयाचा आहे.

1. सदनिकेची संपूर्ण रक्कम खालीलप्रमाणे दोन हप्त्यात भरणा करावयाची आहे

हप्ता /टप्पा	रक्कमेची टक्केवारी	भरणा करावयाची रक्कम	मुदत
पहिला	25%	427981.50	तात्पुरते देकार पत्र प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 45 दिवसांच्या आत
दुसरा	75%	1298944.50	टप्पा 1 च्या मुदतीनंतर पुढील 60 दिवस

टीपः वित्तीय संस्थेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र/जात पडताळणीसाठी शिफारस पत्र घेण्यासाठी 10% रक्कम भरणे अनिवार्य आहे.

उक्त योजनेतील देकार पत्रानुसार रक्कम भरल्यानंतर आपणास सदनिका वाटप करण्यात येईल

2. प्रथम टप्प्यातील 25% रक्कमेचा भरणा करण्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून 45 दिवसानंतर) विलंब शुल्क आकारून 15 दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल. या कालावधीतही (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून 60 दिवसांत) प्रथम टप्प्यातील 25% रक्कम न भरल्यास सदनिकेचे वितरण कोणतीही पूर्वसूचना न देता सदनिका रद्द केले जाईल. यास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही. तसेच टप्पा 1 च्या मुदतीनंतर पुढील 60 दिवसांत सदनिकेची उर्वरित 75% रक्कम भरणे बंधनकारक असते. सदर कालावधीतही अर्जदाराने 75% रक्कम भरणा न केल्यास विलंब शुल्कासह अधिकतम 60 दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल.तदनंतर कोणतीही मुदतवाढ देंण्यात येणार नाही. 60 दिवसांची मुदतवाढ दिल्यानंतर देखील अर्जदाराने 75% रक्कमेचा भरणा केला नसल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदनिका रद्द केले जाईल. यास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

3. तथापि, वेळोवेळी प्राधिकरणाद्वारे निश्चित करण्यात आलेले व्याज भरणे बंधनकारक आहे. तदनंतर ही सदनिकाची किंमत अदा करण्यात कसूर केल्यास किंवा किंबहुना न भरल्यास तात्पुरते देकारपत्र तात्काळ रद्द करण्यात येईल. अशा अर्जदारांना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जमीन विल्हेवाट विनियम-2023 च्या तरतुदीनुसार अर्जासोबत भरलेली अनामत रक्कम तसेच भरणा केलेल्या रक्कमेच्या 10% रक्कम दंड म्हणून कापण्यात येईल.(अनामत रक्कम + भरणा केलेल्या रक्कमेच्या 10% रक्कम) उर्वरित रक्कम असल्यास ती संबंधित व्यक्तीला कोणत्याही व्याजाशिवाय परत केली जाईल. वित्त संस्था/बँकेकडून कर्ज घेतले असल्यास संबंधित वित्त संस्थेला /बँकेला परतावा योग्य रक्कम परत केली जाईल. याची नोंद घ्यावी.

4. ज्या अर्जदारांना 100% रक्कम एकाच वेळेस भरणा करावयाची आहे, असे अर्जदार सदर रक्कमेचा भरणा उपरोक्त नमूद केलेल्या टप्प्याच्या लिंकवर ऑनलाईन पद्धतीने त्याचा भरणा एकाच दिवशी करू शकतात. जे लाभार्थी 100% रक्कमेचा भरणा एकाच वेळी करतील अशा लाभार्थ्यांना सदनिकेचे बांधकाम पूर्ण झाले असल्याने सदनिकेचा ताबा तात्काळ देण्यात येईल.

5. अर्जदारास सदनिका किंमती व्यतिरिक्त खालील शुल्क वेगळे भरावे लागेल.

5.1 नियमानुसार सदर सदनिकाच्या किंमतीपोटी भराव्या लागणाऱ्या रक्कमेवर प्रचलित नियमानुसार महाराष्ट्र शासनाचे योग्य ते मुद्रांक शुल्क व नोंदणी फी, भुईभाडे, अकृषिक आकार कर, दस्त हाताळणी शुल्क संबंधित खात्याकडे भरणा करणे बंधनकारक आहे सदनिकेस वस्तू व सेवा कर (Good & Service Tax) देखभाल खर्च लागू झाल्यास सदर कर कार्यालयाकडे भरणा करणे बंधनकारक आहे. त्यानंतरच सदनिकेचा ताबा दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. या व्यतिरिक्त यशस्वी अर्जदारांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार इतर आवश्यक करांचा भरणा करणे बंधनकारक असेल. सदर रक्कम सदनिकेच्या किंमतीच्या संपूर्ण रक्कमेचा भरणा केल्यानंतर कळविण्यात येईल. या रक्कमेचा भरणा लॉग ईन आयडी मधून ऑनलाईन पद्धतीने वितरणपूर्वी करावयाचा आहे.

5.2 सदनिकेची किंमत व सेवाशुल्कात वाढ झाली तर वाढीव रक्कम भरणे आपणास बंधनकारक राहील.

6. सदनिकेची रक्कम भरण्यासाठी आपण वित्तीय संस्थेकडून /बँकेकडून कर्ज घेणार असल्यास सदनिकाच्या एकूण किंमतीच्या 10% रक्कमेचा भरणा (हप्ता क्र.1 अन्वये) ऑनलाईन पद्धतीने केल्यास इतर अटींच्या अधीन राहून आपण Sanction Letter सादर केलेल्या बँकेच्या नावे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

7. जे अर्जदार बँक कर्ज घेणार आहेत त्यांनासुद्धा उपरोक्त नमूद टप्प्यानुसारच (टप्पा क्र.1 व टप्पा क्र.2) विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने रक्कमेचा भरणा करावयाचा आहे.सदर रक्कमेचा भरणा करणे विहित मुदतीत शक्य न झाल्यास किंवा विलंब झाल्यास आपले सदनिकेचे देकारपत्र तात्काळ रद्द केले जाईल.

8. शासन निर्णय गृहनिर्माण विभाग, दि. 18.08.2016 अन्वये पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सदनिकांचे हस्तांतरण सदनिकांचा ताबा मिळाल्यापासून 10 वर्षे करता येणार नाही.

9. शासनाचे पत्र क्र.संकीर्ण -1494/(9451)/स्वेनि-1, दि. 18.07.1996 व न्यायाप्र-2015/प्र.क्र.16/गृनिभू, दि. 24.09.2015 व दिनांक 12.10.2018 च्या आदेशानुसार सदनिका पत्नीच्या संयुक्त नावे वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्याकरिता विवाहित अर्जदाराने वितरणापूर्वी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पती/पत्नीच्या नावाचा उल्लेख करणे अनिवार्य आहे.

10. सदनिका ताब्यात घेताना व सदनिका ताब्यात घेतल्यानंतर सदनिकेची कसल्याही प्रकारची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी प्राधिकरणावर राहणार नाही.

11 शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती (DT), भटक्या जमाती (NT) ई.प्रवर्गासाठी ताबा देण्यापूर्वी जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय सदनिकेचा ताबा दिला जाणार नाही.सदनिकाच्या एकूण किंमतीच्या 10% रक्कमेचा भरणा (टप्पा क्र.1) ऑनलाईन पद्धतीने केल्यास इतर अटींच्या अधीन राहून आपणास जात वैधता प्रमाणपत्रासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पत्राची गरज असल्यास लॉग इन आयडी मध्ये अर्ज केल्यानंतर सदर पत्र ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येईल.

12.आपण सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये कोणतेही खोटी/बनावट कागदपत्रे आढळून आल्यास वितरणाच्या कोणत्याही टप्प्यावर तसेच वितरणानंतरही कोणत्याही टप्प्यावर सदनिकेचे वितरण पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,जमिन विल्हेवाट विनियम 2023 यामधील तरतूदीनुसार तसेच माहितीपुस्तिकेतील नियमानुसार रदद करण्यात येईल.

13.सदनिका वितरणाबाबत शासनाचे व प्राधिकरणाचे वितरणासंबंधी सर्व कायदे, नियम, अटी व शर्ती तसेच वेळोवेळी होणाऱ्या सुधारणा/बदलांसह लागू राहतील.

14. सदर देकार पत्रातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून सदनिकेच्या किंमतीचा भरणा विहित मुदतीत केल्यास सदर सदनिकाचे अंतिम वितरणपत्र देण्यात येईल. मात्र देकारपत्रातील अटी/शर्तींची पूर्तता न झाल्यास देकारपत्रात नमूद केल्याप्रमाणे सदरचे देकारपत्र रद्द करून अर्जदारांना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जमीन विल्हेवाट विनियम-2023 च्या तरतुदीनुसार अर्जासोबत भरलेली अनामत रक्कम तसेच भरणा केलेल्या रक्कमेच्या 10% रक्कम दंड म्हणून कापण्यात येईल. (अनामत रक्कम + भरणा केलेल्या रक्कमेच्या 10% रक्कम) उर्वरित रक्कम असल्यास ती संबंधित व्यक्तीला कोणत्याही व्याजाशिवाय परत केली जाईल. वित्त संस्था/बँकेकडून कर्ज घेतले असल्यास संबंधित वित्त संस्थेला /बँकेला परतावा योग्य रक्कम परत केली जाईल. याची नोंद घ्यावी.

15.पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदनिका वितरणासाठी किंवा याबाबतच्या कोणत्याही कामासाठी, कोणालाही प्रतिनिधी/सल्ला देणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही अर्जदाराने कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर पैशाचा व्यवहार केल्यास त्याला पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

16. अर्जदार किंवा पत्नी/पती व त्यांची अविवाहित मुले यांच्या नावे मालकी तत्वावर, भाडे खरेदी पद्धतीवर अथवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून राज्यामध्ये कोठेही पक्के घर नसावे. गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. याचिका 2011/प्र.क्र.66गृनिप दिनांकः11 सप्टेंबर 2019 अन्वये शासकीय गृहनिर्माण योजनेतील घर धारण करीत असलेल्या व्यक्तीस त्या किंवा अन्य कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेत दुसरे घर अनुज्ञेय नाही याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यातील एखादी व्यक्ती किंवा तिचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्ती, राज्यातील कोणत्याही भागात महाराष्ट्र शासनाच्या किंवा शासन अधिनस्त कोणत्याही प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेत त्याला मालकी तत्वावर वाटप झालेले/वितरीत झालेले घर/सदनिका धारण करत असेल अथवा केंद्र शासन/राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त गृहनिर्माण /आवास योजनेचा लाभ घेताना असेल तर या आशा व्यक्ती किंवा त्याच्या/तिच्या कुटुंबियांना राज्यामध्ये कोठेही राज्य शासनाच्या /शासन अधिनस्त प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्थेकडे किंवा अन्य कोणत्याही गृहनिर्माण योजनेत शासकीय योजनेतील दुसरे घर सदनिका अनुज्ञेय नाही.

17.आपण वर दर्शविलेल्या मुदतीत रक्कमेचा भरणा न केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता आपला सदनिका मिळण्याचा हक्क रद्द करण्यात येईल. व प्रतीक्षा यादी वरील व्यक्तीस सदनिका वाटप करण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

विशेष टीप : जात वैधता प्रामाणपत्र देकारपत्र निर्गमित झाल्यापासून 90 दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक असेल. जात वैधता प्रमाणपत्राशिवाय दस्त नोंदणीची प्रक्रिया केली जाणार नाही तसेच सदनिकेचा ताबा दिला जाणार नाही. व वाटपित सदनिका रद्द करण्यात येईल व आपण जमा केलेल्या रक्कमेतून अनामत रक्कम व भरणा केलेल्या रक्कमेतून 10% रक्कम दंड म्हणून कापण्यात येईल व उर्वरित रक्कम असल्यास ती संबंधित व्यक्तीला कोणत्याही व्याजाशिवाय परत केली जाईल. वित्त संस्था/बँकेकडून कर्ज घेतले असल्यास संबंधित वित्त संस्थेला /बँकेला परतावा रक्कम परत केली जाईल. याची नोंद घ्यावी.

Signature Not Verified
Signed By:POONAM VIJAY MEHTA
Location:PMRDA

(पूनम मेहता)
सह आयुक्त
पुणे महानगर प्रदेश विकास
प्राधिकरण, पुणे